श्री. एल. आर. नाईक, माजी खासदार
मागासवर्गीय आयोगाचे सदस्य यांची
मतभेद नोंदवणारी टिप्पणी

मा. राष्ट्रपती महोदयांनी मागासवर्गीय आयोगाच्या सदस्यांना भारतातील मागासवर्गीय नागरिकांचे सामाजिक व आर्थिक प्रश्न समजून घेण्याबाबत आदेश दिले आहेत. हे फार मोठे व अवघड कार्य आहे. हे कार्य पार पाडण्यासाठी मी आयोगाचे अध्यक्ष व इतर सदस्यांना माझ्या क्षमतेनुसार व समजुतीनुसार जास्तीत जास्त मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. या कामामध्ये मला त्यांच्याकडून, विशेषत: आयोगाचे अध्यक्ष श्री. बी.पी. मंडल यांच्याकडून पूर्ण सहकार्य व उत्तेजन मिळाले याचा मला आनंद वाटतो. म्हणूनच आयोगाला दिलेल्या सूचनेनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या नागरीकांच्या वर्गीकरणाची आयोगाने ठरवलेल्या पद्धतीबाबत मतभेद नोंदवणारी माझी वेगळी टिप्पणी जोडताना मला खेद होत आहे व मी हे नाईलाज म्हणून करीत आहे.

आयोगाने काही विशिष्ट निकषांच्या आधारे शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या नागरीकांच्या वर्गांची एक सामाजिक यादी विभाग ९ मध्ये सादर केली आहे. त्यामध्ये मी खालील तऱ्हेने बदल सुचवतो.

मला प्रामाणिकपणे असे वाटते की, सामाजिक यादीमध्ये उल्लेख केलेल्या जाती/वर्गांमध्ये, एकजिनसीपणा असला तरी त्या सर्व जाती व सर्व वर्ग एकाच सामाजिक वा शैक्षणिक मागासलेपणाच्या पातळीवर नाहीत. त्यांच्या सुरक्षिततेसाठी ज्या उपायांची शिफारस केलेली आहे ते दुर्दैवी जाती/वर्गांपर्यंत पोचणार नाहीत व समानतावादी समाज निर्माण करण्याच्या घटनेचे ध्येय ही एक कल्पनाच बनून राहील, अशी मला भीती वाटते. टाटा इन्स्टीट्यूट ऑफ सोशल स्टडीजच्या अहवालात (भाग-४) काही जमातींचा उल्लेख आहे की, ज्यांचा सामायिक यादीमध्ये उल्लेख आहे. अशा जमातींना "मागासलेल्या जातीतील मध्यमस्तरीय जमाती" असे म्हणून या अशा जमातींना त्यांच्या संख्याबळावर किंवा प्रदीर्घ काळ भारतवर्षातील शहरे व खेडी यामध्ये प्रगत जाती जमातींबरोबर सह अस्तित्वाच्या बळावर भारतातील जातीय व्यवस्थेमध्ये स्वत:चे अस्तित्व

दाखवून दिले आहे. अशा जमातींना भविष्यात उचित प्रोत्साहन व संधी प्राप्त करुन दिली, तर त्या जाती सर्वसामान्य जनतेत आज ना उद्या मिसळून जातील यात मला शंका नाही. परंतु सामायिक यादीमध्ये अशा अनेक जाती जमाती आहेत की ज्या सामाजिक तसेच आर्थिक अशा दोन्ही दृष्टीने अत्यंत मागसलेल्या असल्यामुळे नजीकच्या भविष्यात अशा तऱ्हेने सर्वसामान्य जनतेत मिसळून जाऊ शकणार नाहीत. त्यांचा सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणा हा त्यांच्या आर्थिक मागासलेपणाला कारणीभूत आहे. अशा वर्गांना "दबले गेलेले मागासलेले वर्ग" असे यापुढे संबोधले जाईल. हे वर्ग "मागासलेल्या जातीतील मध्यमस्तरीय जमाती" पेक्षा वेगळ्या असतील. अशा "दबल्या गेलेल्या मागासवर्गीयांना" प्रगती साधण्यासाठी व अधिक ज्ञान मिळण्यासाठी खूप वेळ लागेल कारण त्या अत्यंत मागसलेपणात रुतून बसल्या आहेत. त्यासाठी राष्ट्रीय स्तरावरुन त्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले पाहिजेत व ते त्यांच्यापर्यात मोठ्या प्रमाणात पोचले पाहिजेत. हे काम चतुरपणे केले पाहिजे त्यामुळे त्यांना मुख्य सामायिक यादीतून वेगळे करुन त्यांचा एक वेगळा गट केला पाहिजे. त्याद्वारे त्यांच्यामध्ये सुरक्षिततेच्या उपायांसाठी समान वर्गात किंवा ब-याचशा अंशी समान असलेल्या समान वर्गात निरोगी स्पर्धा होईल व असमान वर्गात स्पर्धा होणार नाही. याच कारणांसाठी सामाजिक यादीतील इतर जमातींनी वेगळा गट तयार करावा. संपूर्ण देशाच्या हिताचा विचार केल्यास ही एक आवश्यक गोष्ट आहे.

माझ्या मते ज्या जमातींचा पारंपारिक व्यवसाय पुढीलप्रमाणे आहेत. :- शेती, बागातील उत्पादनाचे वितरण, खाण्याची पाने उत्पादन करणे, धनगर, विविध कारागीर, निरोप देणारे, शिंपी, रंगारी, विणकर यासारखे किरकोळ व्यवसाय व शेतकी व्यवसाय, गुरे पाळणे, देवळात पूजा करणे व इतर सेवा, ताडी विकणे, तेल गाळणे, लढाई करणे, ज्योतीष सांगणे इत्यादी. अशा जमाती या मागासवर्गातील "मध्यस्तरीय जमाती" या गटात मोडतात. हे वर्ग अनादी काळापासून प्रगत जातींबरोबर राहिले आहेत व त्यामुळे त्यांना अशा प्रगत व उच्च वर्गाबरोबर मिसळून जाण्याच्या संधी उपलब्ध आहेत. मात्र "दबलेल्या दलित वर्गांना" त्यांच्या पारंपारिक व्यवसायामुळे, भटक्या वृत्तीमुळे इतर वर्गीयांबरोबर मिसळणे नाकारले गेले, त्याला प्रतिबंध केला गेला तसेच त्यांना वाळीत टाकले गेले व त्यांची सामाजिक स्थिती अत्यंत दयनीय व खालची झाली आहे.

सर्वसाधारणपण यासाठी पूर्वी गुन्हेगार असलेल्या जाती, भटक्या व विमुक्त जाती, खाणीत काम करणारे, कोळी, नावाडी, भोई, पालखी वाहणारे, मिठागारात काम करणारे, धोबी, धनगर, न्हावी, भंगी, टोपली विणणारे, लोकरी कपड्याचे व्यापारी, कातडी कमावणारे, भूमीहीन शेतमजूर, पाणके, ताडी गाळणारे, उंटावरुन वाहतुक करणारे, वराहपालन करणारे, बैलगाडी चालवणारे, जंगलातील उत्पादन गोळा करणारे, शिकारी व हाकारे घालणारे, उंटाने माल वहाणारे, आदिवासी जमाती (अनुसूचित जमातीमध्ये नोंद न केलेल्या मूळ जाती) (अनुसूचित जमातीमध्ये नोंद न केलेल्या बाह्य जमाती) भिकारी इत्यादी यांचा दबलेले दलित वर्ग या गटात समावेश आहे.

या नावावरुनच त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक मागसलेपणाचा बोध होतो. त्यामुळे घटनाकारांनी या वर्गांना वर्गीकरणासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक होते. या गोष्टी उघड आहेत व त्यासाठी सिद्धतेची/पुराव्याची आवश्यकता नाही. माझे असे प्रामाणिक मत आहे की, घटनाकारांच्या या चुकांमुळे सामाजिक, आर्थिक व राजकीय आधारीत समतावादी समाजाची रचना होण्यात गंभीर अडथळे निर्माण झाले आहेत.

स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे होऊन गेली तरीही भारतीय जनतेचे हे दुर्दैवी घटक अद्यापही स्वातंत्र्याच्या लाभांपासून वंचितच राहिले आहेत. देशाच्या कायद्यांचा लाभ मिळण्याच्या ऐवजी त्यांना दुर्दैवाला शरण जावे लागते. भारतीय राज्य घटनेमधील स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तीन महत्वाच्या मुद्यांचा खरा अर्थ व लाभ यापासून हे सर्वजण वंचितच राहिले आहेत. काही राज्यामधील वर्गीकरणाच्या आधारे (सर्व राज्यांच्या नव्हे) असे म्हणता येईल की या जमातींपैकी बहुंसख्य जमाती अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती आहेत.

मी भारताच्या सर्व भागांचा सर्वदूर दौरा केला, बराचसा भारत फिरलो व त्यात मला असे आढळले की, ज्या तऱ्हेने उच्चवर्णीयांनी "मागासलेल्या जमातीतील मध्यमस्तरीय जमातींना" छळले. तसेच या मध्यमस्तरीय जमाती दबलेल्या दलित वर्गांना छळत आहेत. असमानता व विषमतेने भरलेल्या समाजामध्ये अधिक अगतिक व गरजू समाज घटकांना विविध सुरक्षात्मक लाभांपासून वंचित रहायला लागू नये व त्यांना गळेकापू स्पर्धेला तोंड द्यायला लागू नये यासाठी आयोगाने सर्वतोपरी उपाय योजले पाहिजेत. जातीयवाद आपल्यात अजूनही आहे व मूळ तीव्रता

कमी न होता तो विविध स्वरुपात प्रकट होत आहे. अनेक निरीक्षकांना असे वाटते की, लोकशाही पद्धतीचे राजकारण व मोठ्या प्रमाणावरील जनतेमधील गतीशीलता यामुळे जातीयवादाला महत्व मिळाले आहे. मागासलेल्या जमातीतील मध्यमवर्गीय जमातींचे राजकीय पुढारी या पासून अलिप्त राहीले नाहीत व समाजातील तळागाळातील दबलेल्या दलित वर्गांची प्रगती व्हावी यासाठी त्यांनी कोणतेही नवीन विचार किंवा कल्पना अंमलात आणल्या नाहीत. काही असंतुष्ट उच्चवर्गीय जाती दलितांच्या नावाखाली आर्थिक व राजकीय सत्ता हडप करीत आहेत व उपरोक्त पुढारी त्यांचे अनुकरण करीत आहेत. ज्या कोणत्याही समाज घटकातून हा भेदभाव निर्माण झाला आहे, मग तो उच्चवर्ण असो की, मागासलेल्या जातीमधील मध्यमवर्गीय जमाती असोत, त्यांचा तीव्र निषेध केला पाहिजे.

"मोठा मासा छोट्या माशाला गिळतो" ही म्हण भारतातील जात व्यवस्थेला लागू पडते. त्यामुळे सुरक्षिततेचे सर्व उपाय व त्यांचे लाभ समाजाच्या सर्व विभागांना समान व विवेकपूर्ण पद्धतीने विभागले गेले पाहिजेत याची सर्वतोपरी काळजी घेतली पाहिजे. असमानांमध्ये स्पर्धा टाळणे व समानांमध्ये स्पर्धा घडवून आणणे या दोन मार्गांनी हे साध्य होऊ शकते. म्हणून मी असे प्रस्तावित करतो की, सामायिक यादींचे "अ" आणि "ब" असे दोन विभाग करावेत. "अ" यादीमध्ये "दबलेले दलित वर्ग" समाविष्ट असतील, तर "ब" यादीत "मागास जमातीतील मध्यमवर्गीय जमाती" असतील. राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या संदर्भात "दबलेल्या दलित वर्गांची" यादी सूची-२ मध्ये दिलेली आहे.

आरक्षण किती असावे :-

भारतीय लोकसंख्येची जात व धर्म यानुसार टक्केवारी मुख्य अहवालात नमूद केली आहे. अहिंदू जमातीसकट अन्य मागासलेल्या जातींची टक्केवारी ५२% आहे. हिंदू मागासलेल्या जाती/गटांची टक्केवारी ४३.७०% आहे, तर अहिंदू मागासलेल्या जाती/गटांची टक्केवारी ८.४०% आहे. अन्य मागासलेल्या जातींची वर्गवारी "दबलेले दलित वर्ग" व "मागासलेल्या जातीतील मध्यमवर्गीय जमाती" या तत्वावर वर्गीकरण केल्यास त्यांची होणारी टक्केवारी सूची १ मध्ये दिली आहे. यावरुन असे दिसून येईल की, "दबलेले दलित वर्गाची" लोकसंख्या २५.५६%

आहे व मागासलेल्या जातीतील मध्यस्तरीय जमातीची लोकसंख्या २६.४४% आहे. म्हणजेच ते जवळजवळ सारखेच आहेत.

बऱ्याच चर्चेनंतर आयोगाने भारत सरकारच्या केंद्र सरकारच्या सर्व सेवांमध्ये २७% पर्यंत आरक्षणाची शिफारस केली आहे. मी याच्याशी पूर्णपणे सहमत आहे. आयोगाने अशीही शिफारस केली आहे की, केंद्र सरकार तसेच राज्य सरकार यांनी चालवलेल्या वैज्ञानिक, तांत्रिक व व्यावसायिक संस्थामध्ये सुद्धा २७% आरक्षण करावे.

"दबलेले दलित वर्ग" तसेच अनुसूचित जाती व जमातीमधील मध्यमवर्गीय जमाती यांच्या मागासलेपणाच्या बाबतीत तुलना होऊ शकते. तसेच न्यायोचित दृष्टीने मी अशी शिफारस करतो की, केंद्र सरकारच्या सर्व सेवांमध्ये तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये शिफारस केलेल्या २७% आरक्षणापैकी दबलेल्या दलित वर्गांना १५% आरक्षण द्यावे. त्यांना अनुसूचित जाती जमातींच्या सर्व सवलती मिळाव्यात. मी राजकीय आरक्षणाची शिफारस करीत नाही. मात्र त्यांनी एकत्र यावे व संघटना बांधावी असे मी त्यांना आवाहन करतो. त्यायोगे ते त्यांची युगानुयुगे होणारी सामाजिक, आर्थिक व राजकीय मानहानी थांबवू शकतील. त्यांनी कोणाचाही द्वेष करु नये व सर्वांवर प्रेम करावे व स्नेह बाळगावा. त्यांच्या उन्नतीसाठी व मानहानीपासूनच्या मुक्तीसाठी त्यांनी त्यांच्या सामाजिक मागासलेपणा विरुद्ध लढा द्यायचा आहे तो मुख्यतः त्यांच्या मनातच द्यायचा आहे, हे त्यांनी समजून घेतले पाहिजे. आपल्या देशातील राज्यकर्त्यांना असा सावधानतेचा इशारा देऊ इच्छितो की, जोपर्यंत दलित लोकांची व त्यांची बरोबरी होत नाही, तोपर्यंत समतावादी समाजाची घडण होणार नाही. म्हणून त्यांनी मागासलेल्यांसाठी केलेल्या आरक्षणाविरुद्ध कोणतेही आंदोलन करु नये व तसे केल्यास त्यांची व देशाची हानी होईल.

आभार :-

श्री. बी.पी. मंडल, अध्यक्ष यांनी मला या आयोगात सदस्य म्हणून समाविष्ट केले याची मला जाणीव आहे. मी त्यांचा उपकृत आहे. त्यांनी मला जे प्रोत्साहन दिले व माझ्याशी अत्यंत सौहार्दपूर्ण वर्तन केले त्याचे मी कायम स्मरण करीन. तसेच आयोगाच्या इतर आदरणीय सदस्यांची त्यांनी दिलेल्या सहकार्याबाबत मी आभारी आहे.

डॉ. एल. भीमप्पा, शस्त्रक्रीयेचे प्राध्यापक, बंगलोर मेडीकल कॉलेज यांनी मला भारत भरातील "दबलेल्या दलित वर्गांना शोधून काढण्यात व त्यांची लोकसंख्या शोधून काढण्यासाठी मला बहुमोल मार्गदर्शन केले यासाठी त्यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे. दलितांचे प्रश्न जाणून घेण्यात ते खूपच प्रवीण आहेत व त्यांनी याबाबत आयोगाला दिलेल्या सल्ल्याबाबत त्यांची कदर केली पाहिजे.

सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशातून आयोगावर नेमल्या गेलेल्या सर्व सदस्यांचाही त्यांनी दिलेल्या सहकार्याबाबत व सल्ल्याबाबत मी मन:पूर्वक आभारी आहे.

सही-

(एल. आर. नाईक)